सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ५ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# महिनाभरात शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होणार

## पीक नुकसानीची भरपाईही मिळणार,- कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५पुणे-** राज्यातील कर्जमाफी बाबतच्या सर्व माहितीचे संकलन पूर्ण झाले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या एक महिन्याच्या आत यावर अंतिम निर्णय घेतील, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.महाराष्ट्र सरकारने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली आहे. या अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाखांपर्यंतचे थकबाकीदार शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ होणार असून, नियमित कर्जदारांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे.शेतकरी कर्जमाफी संदर्भात माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कर्जमाफीबाबतची सर्व तांत्रिक माहिती गोळा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. एका महिन्याच्या आत यावर



अंतिम शिक्कामोर्तब होईल. यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. याशिवाय, मागील दोन महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाची मदतही संबंधित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जात असल्याचे त्यांनी सांगितले.अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीबाबत बोलताना कृषिमंत्री भरणे म्हणाले की, बाधित क्षेत्रांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना शासनाच्या नियमानुसार लवकरच भरपाईचे वाटप करण्यात येईल. शेतकरी हितासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

### शेतकऱ्यांसाठी 'कृषी मित्र' योजना

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभाग आता 'कृषी मित्र' ही नवी योजना राबवणार असल्याची घोषणा कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यभरात ११ हजार ५८७ पर्यवेक्षकांची जिल्हास्तरावर नियुक्ती केली जाणार आहे. निवड झालेल्या कृषी मित्रांना वर्षाला १८ हजार रुपयांचे मानधन दिले जाणार असून, हे मानधन दर तीन महिन्यांनी त्यांच्या खात्यात जमा केले जाईल.१ जूनपासून ही योजना संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबवण्याचा सरकारचा मानस असल्याचे भरणे यांनी सांगितले. आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान गावागावातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश असून यामुळे ग्रामीण भागात रोजगाराची नवी दारे उघडतील, असा विश्वास भरणे यांनी व्यक्त केला.

#### पात्रता आणि अटी

**या योजनेत सहभागी होण्यासाठी कृषी विभागाने काही निकष निश्चित केले आहेत:**

**अर्जदाराचे वय ४० वर्षांपेक्षा कमी असावे.**

**किमान माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे.**

**अर्जदाराकडे उत्तम संवाद कौशल्य आणि समाजकार्याची ओढ असावी.**

**सोशल मीडियाचा प्रभावी वापर करता येणे अनिवार्य आहे.**

**महिला सक्षमीकरणासाठी या योजनेत ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.**

# लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका

## मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई-** पुण्याच्या नसरापूर बलात्कार व हत्या प्रकरणामुळे अवघ्या राज्यात संतापाची लाट उसळली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधी व न्याय विभागाला लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याचे स्पष्ट निर्देश दिलेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. त्यानंतर पुन्हा ते तोच गुन्हा करतात. त्यामुळे या आरोपींना पॅरोल देऊ नका, असे



ते म्हणालेत.पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथील एका ४ वर्षीय चिमुकलीवर एका ६५ वर्षीय नराधमाने बलात्कार करून तिची दगडाने ठेचून हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत विधी व न्याय विभागाला उपरोक्त निर्देश दिलेत. ते म्हणाले, लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यांत अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात. पॅरोलवर सुटल्यानंतर ते पुन्हा तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात सरकारने यासंबंधी एक कायदा केला होता. सदर कायदा २-३ वर्षे अस्तित्वात होता. पण कालांतराने तो कायदा कोर्टाने रद्दबातल केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

# राऊतांनी पाकिस्तानात जावून निवडणूक लढवावी: ममता-स्टॅलिन घरी गेले

## 'इंडिया' आघाडीत आता फक्त काँग्रेसच शिल्लक- नवनाथ बन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई** पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापले असून भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी 'इंडिया' आघाडीवर जोरदार निशाणा साधला आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी आघाडीला बाजूला सारून निवडणूक लढवली, मात्र या निकालांनी आघाडीचे अस्तित्वच धोक्यात आणल्याचे त्यांनी म्हटले आहे. ममता बॅनर्जी आणि एम. के. स्टॅलिन हे उद्धव ठाकरेंचे जवळचे मित्र होते. मात्र, जनतेने या दोघांनाही घरी पाठवले आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जींनी आघाडीला महत्त्व न देता स्वतंत्रपणे निवडणूक लढवली, ज्यामुळे आता त्या आघाडीत कुणीही उरलेले नाही.नवनाथ बन म्हणाले की, या आघाडीत आता केवळ काँग्रेस उरली आहे. मात्र, काँग्रेसचे स्वतःचे भवितव्य काय आहे, हे राहुल गांधी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना चांगलेच ठाऊक आहे. विरोधक कितीही एकत्र येण्याचा प्रयत्न करत असले, तरी जमिनीवर त्यांचे अस्तित्व संपत चालले आहे.

### राऊतांनी पाकिस्तानात जावे

नवनाथ बन म्हणाले की, इंडिया आघाडीला देशात तर उबाठाला महाराष्ट्रात निवडणूक जिंकणे अवघड दिसत आहे. संजय



राऊत यांना पुन्हा महाराष्ट्रातून राज्यसभेवर संधी मिळेल असे वाटत नाही. त्यामुळे राऊतांनी पाकिस्तानमध्ये जात खासदारकीची निवडणूक लढवावी.कारण त्यांची तिथे चांगली चालते. ते त्यांचा उदोउदो करतात. ठाकरे, राऊत यांनी पाकिस्तानमध्ये पक्ष वाढवावा, आणि भारताचे नागरिकत्व सोडावे.

### राउतांमुळे अवस्था वाईट

नवनाथ बन म्हणाले की, संजय राऊत यांनी एक अश्वकोश निर्माण केला पाहिजे. संजय राऊत जी भाषा वापरतात त्यासाठी शब्दकोश ही तर अश्वकोश लागेल. कारण त्यांच्या बोलण्यामुळे उबाठा गटाला अश्व लागले आहेत. त्यांच्या पक्षाची अवस्था वाईट झाली आहे. त्या अश्वकोशाचे प्रकाशन उद्धव ठाकरेंच्या हस्ते करावे, जेणेकरून त्यांच्या पक्षाची अधोगती का झाली हे महाराष्ट्राला समजेल. निवडणूक हरले की राऊत काय काय शब्द शोधून काढतात. त्यांच्या पक्षाला अश्व कसे लागले हे यातून कळते. नवनाथ बन म्हणाले की, पश्चिम बंगाल, आसाममध्ये भाजप जिंकले तर लोकशाहीसाठी घातक आहे. आणि केरळमध्ये काँग्रेस जिंकले तर लोकशाहीचा विजय असतो, तामिळनाडूमध्ये विरोधक जिंकले तर तिथे लोकशाहीचा विजय असतो. अन् भाजप जिंकले तर राऊतांना मिर्च्या झोंबतात. निवडणूक या पापात सहभागी नाहीत. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी जी दादागिरी केली, जे पाप केले ते धुण्याचे काम जनतेने केले आहे. तिथे अनेक वर्षे दीदीच्या गुंडानी महिलावर अत्याचार केले ते पाप धुण्याचे काम जनतेने केले.

# निवडणूक हरताच ममता बॅनर्जींना इंडिया आघाडीची आठवण झाली

## म्हणाल्या, सगळे माझ्या पाठिशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५कोलकाता -** मी राजीनामा देण्यासाठी लोकभवनात जाणार नाही. आम्ही पक्षाच्या सदस्यांसोबत आमच्या पुढील रणनीतीवर चर्चा करू. मी भाजपाचे अत्याचार यापुढे सहन करणार नाही. मी पुन्हा रस्त्यावर उतरेन. इंडिया आघाडी माझ्यासोबत आहे. सोनिया गांधी यांनी मला फोन केला. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन आणि तेजस्वी यादव या सर्वांनी माझ्याशी संपर्क केला. इंडिया आघाडी माझ्यासोबत असल्याचे त्यांनी मला सांगितले. अखिलेश यादव उद्या येत आहेत, असे तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले.

प. बंगाल विधानसभा निवडणुकीत यंदा मतदारांनी १५ वर्षांपासूनचे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे सरकार पायउतार करीत गेल्या सुमारे ५० वर्षांपासून राज्यात ठराविक



मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांनी तब्बल १५ हजार १०५ मतांनी ममता बॅनर्जी यांचा मोठा पराभव केला. सुवेंदू अधिकारी यांना एकूण ७३ हजार ९१७ मते मिळाली, तर ममता बॅनर्जी यांना ५८

काळानंतर सत्तापालट घडवून आणारी एकतर्फी निवडणुकीची परंपरा कायम राखली. पश्चिम बंगालमध्ये भाजपाला तब्बल २०६ जागा मिळाल्या. तर तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. भवानीपूर हजार ८१२ मतांवर समाधान मानावे लागले. यानंतर आता मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी भाजपावर जोरदार टीका करत अनेक गंभीर आरोपही केले. महाराष्ट्र आणि बिहारप्रमाणे आता पश्चिम बंगालमध्येही लोकशाहीची हत्या झाली आहे. इंडिया आघाडी एकजूट आहे आणि माझ्यासोबत आहे. मतमोजणीच्या पहिल्या फेरीनंतर, भाजपा अनेक जागांवर आघाडीवर असल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांनी द्यायला सुरुवात केली. भाजपाच्या गुंडांनी धक्काबुक्की केली, मारहाण केली. जेव्हा मी बूथवर पोहोचले, तेव्हा सीएपीएफने मला आत जाऊ नका असे सांगितले. मी आरओकडे लेखी तक्रार दाखल केली. पण आम्ही परत येऊ. आम्ही लढू, असा दावा ममता बॅनर्जी यांनी केला. आम्ही हरलेलो नाही. भाजपाने हा विजय चोरला आहे. केंद्रीय सुरक्षा दलांना असे वागताना मी कधीही पाहिले नाही, असे ममता दीदी यांनी म्हटले आहे.

# मेगा शिक्षक भरतीला हिरवा कंदील

## जुन्या नियमात बदल, ३१ मेपर्यंत हजारो पदांसाठी मोठी संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई**




राज्यातील शिक्षक भरतीची वाट पाहणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. अनेक महिन्यांपासून रखडलेली भरती प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकणार असून राज्यभरात मेगा शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण विभागाने सर्व शाळांना ३१ मे २०२६ पर्यंत त्यांच्या रिक्त पदांच्या जाहिराती 'पवित्र' पोर्टलवर प्रसिद्ध करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, नगरपालिका आणि खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याचा मार्ग खुला झाला आहे.

या भरती प्रक्रियेत एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. केवळ सध्या रिक्त असलेल्या जागाच नव्हे, तर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य रिक्त पदांचाही समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे उपलब्ध पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. परिणामी अधिकाधिक पात्र उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार असल्याने या निर्णयाचे स्वागत होत आहे.

रती प्रक्रियेची वेळापत्रक देखील निश्चित करण्यात आले आहे. १ मे ते ३१ मे या कालावधीत सर्व शाळा व्यवस्थापनांनी त्यांच्या रिक्त पदांची माहिती 'पवित्र' पोर्टलवर नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंतर जून महिन्यात उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आणि गुणांच्या आधारे शाळांचे पसंतीक्रम निवडण्याची संधी मिळणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असल्याने पारदर्शकता वाढणार आहे.

गेल्या वर्षी झालेल्या 'शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी' (ढ-खढ) परीक्षेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. सुमारे २ लाख २८ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. या उमेदवारांपैकी १ लाख ७० हजार १०८ जणांनी स्व-प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली आहे. या पात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेत प्राधान्य दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# दिवाळीआधी एकनाथ शिंदे 'भाकरी' फिरणार?

## मंत्रिमंडळात फेरबदलाचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५छत्रपती संभाजीनगर -** येत्या काही महिन्यांत शिवसेना (शिंदे गट) पक्षात आणि राज्य मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची दाट शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिवाळीपूर्वी आपल्या मंत्रिमंडळाची 'भाकरी' फिरवण्याच्या तयारीत असून, जे मंत्री पक्ष संघटना बळकट करण्यात अपयशी ठरले आहेत, त्यांना डच्चू दिला जाऊ शकतो. त्यांच्या जागी राज्यमंत्र्यांची कॅबिनेट पदी वर्णी लागण्याची किंवा नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. या सर्व चर्चांवर शिंदे गटाचे प्रवक्ते आणि राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी मोठे विधान केले आहे.

राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'बाबत मंत्री संजय शिरसाट यांनी महत्त्वाची विधाने केली आहेत. शिरसाट म्हणाले की, ऑपरेशन टायगर केव्हा आणि कधी करायचे, याची पूर्ण कल्पना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आहे. ज्या दिवशी गरज भासेल, त्या दिवशी हे



## 'ऑपरेशन टायगर'वरून संजय शिरसाटांचा मोठा गौप्यस्फोट

ऑपरेशन यशस्वी होईल. आजही उद्धव ठाकरे गटाचे अनेक आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात आहेत. ठाकरे गटाकडे आता ती ताकद उरलेली नाही, त्यामुळे हे परिवर्तन अटळ आहे.

काही निर्णय सांगून होत नाही

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिवाळीपूर्वी मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी देणार असल्याची माहिती आहे. याबाबत संजय शिरसाट यांना विचारले असता, दिवाळीपूर्वी खांदेपालट होणार की शिंदे साहेब भाकरी फिरवणार हा निर्णय सांगून होत नाही तर जागेवर होतो. त्यामुळे दिवाळीनंतर एकनाथ शिंदे काय निर्णय घेतात याकडे सगळ्यांचं लक्ष आहे, असे ते म्हणाले.

## संपादकीय ......

# सत्तांतरास कारण की..

*४ मे २०२६ ही तारीख भारताच्या निवडणूक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिली जाईल. कारण या दिवसाने तीन राज्यांमधील सत्ता उलथवून टाकली आहे. भाजप आणि काँग्रेससाठी तर हा दिवस अगदी खास म्हणता येईल. कारण भाजपने अशक्य ते शक्य करून दाखवले आहे. आसाममध्ये भाजपने विजयाची हॅट्रिक केली आहे तर पश्चिम बंगाल भगवामय केला आहे. शिवाय केरळमधील डाव्यांची सत्ता खालसा करून सत्तेवर येण्याचे काँग्रेसचे प्रयत्न यशस्वी झाले. डाव्यांच्या पराभवामुळे देशात सत्तेत असलेली एकमेव डावी आघाडी सत्तेतून पूर्णपणे बाहेर फेकली गेली आहे. दक्षिणेत पुदुचेरीमध्ये एनआरसीसोबत भाजप पुन्हा सत्तेच्या केंद्रस्थानी राहिली आहे.*

*१० वर्षांपासून पश्चिम बंगालमध्ये भाजपची सत्ता आणण्याचे पक्षाचे अतोनात प्रयत्न सुरू होते. मात्र, ममता बॅनर्जी काही केल्या भाजपला सत्ता मिळू देत नव्हत्या. मात्र, २०१६ च्या निवडणुकीत अवघ्या चार जागा मिळवलेल्या भाजपने २०२१ च्या निवडणुकीत ७७ जागा मिळवल्या होत्या. यातून भाजपने बंगालमध्ये मारलेली मुसंडी लक्षात येते. आता तर त्यांनी निर्विवाद बहुमत मिळवून ममता बॅनर्जी यांना सत्तेतून पायउतार करण्यात भाजपला यश आले आहे. हे करताना एसआयआरच्या नावाखाली किती लाख मतदारांना बाजूला केले, निवडणूक आयोगाला हाताला धरून काय केले, ममता बॅनर्जींवर किती वाईट पद्धतीने टीका केली, असे अनेक आरोप भाजपवर होत आहेत. तरीही एकेकाळी डाव्यांचा बालेकिल्ला असलेला, त्यानंतर तृणमूलच्या ममता बॅनर्जी यांनी सर्वधर्मसमभाव म्हणून सांभाळलेल्या प. बंगालला भगव्या शालीत लपेटण्यात भाजपला यश आले आहे, हे नाकारून जमणार नाही.*

*पाच राज्यांच्या निवडणुकीत बंगालवर भाजपची सत्ता येणे याहून भाजपसाठी कोणताही मोठा विजय असू शकत नाही. याला दीदींची एकाधिकारशाहीदेखील कारणीभूत आहे. दंगल, महिला अत्याचार अशा घटनांनंतरही ममता बॅनर्जी फार गंभीर दिसल्या नाहीत. हीच बाब भाजपने हेरली आणि बंगाली मतदारांवर बिंबवली. दुसरे महत्त्वाचे राज्य म्हणजे तामिळनाडू! डीएमकेचे सर्वेसर्वा एम. के. स्टॅलिन यांना त्यांचाच पक्ष पुन्हा सत्तेवर येईल आणि पुन्हा तेच मुख्यमंत्री होतील अशी स्वप्ने पडत होती. मात्र, दोन वर्षांपूर्वी विजय थलपती यांनी स्थापन केलेल्या टीव्हीके पक्षाने चमत्कार केला. बाल्यावस्थेतील या पक्षाने ७७ वर्षे जुन्या डीएमकेच्या गडाला सुरूंग लावला. टीव्हीकेला संपूर्ण बहुमत मिळाले नसले तर बहुमताच्या काठावर आहे. तामिळनाडूचा राजकीय इतिहास पाहिला तर डीएमके आणि अण्णा द्रमुक यांची आलटून पालटून सत्ता येते. पण पहिल्यांदाच 'थर्ड पार्टी' सरकार आले आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे रजनीकांत किंवा कमल हसन यांना अनेक वर्षांत जे शक्य झाले नाही तो चमत्कार विजय थलपथी यांनी अवघ्या दोन वर्षांत करून दाखवला. त्यामुळे तामिळनाडूतील सत्तांतराची दखल घ्यावीच लागेल. आणखी एका राज्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल तो म्हणजे केरळ आणि आताचे केरळम! या राज्याला देवभूमी तसेच शिक्षितांचे राज्य म्हणून ओळखले जाते. दशकापासून केरळवर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे (मार्क्स) राज्य होते. डाव्यांची सत्ता असलेले केरळ देशातील एकमेव राज्य होते. मात्र, काँग्रेस प्रणीत युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटने डाव्यांना सत्तेतून बाहेर खेचले आहे.*

*पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळम या तीन राज्यांतील सत्तांतरांचा अन्वयार्थ काढण्याचा प्रयत्न केला तर त्या त्या सरकारविरोधात असलेली नाराजी हेच उत्तर येते. बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या सरकारमध्ये अनेक दोष असले तरी त्यांना पर्याय नसल्याने त्या सत्तेवर होत्या, हे तेथील वास्तव आहे. म्हणून भाजपने संधी साधली. इकडे केरळमध्येही मुख्यमंत्री पिनरई विजयन यांच्याविरोधात प्रचंड नाराजी होती. तर तामिळनाडूमध्ये स्टॅलिन यांच्याविरोधात फार आवाज नसला तरी सुपरस्टार विजय थलपथी यांची राजकारणातील एन्ट्री तमिळींना भावली आहे. आसाममध्ये भाजपने त्यांचा पाया अधिक भक्कम केला आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपला यश मिळाले आहे. भाजपने सलग तिसरा विजय मिळवला आहे. आणखी बाब लक्षात घ्यावी लागेल की आसामी जनतेने काँग्रेसला पुन्हा नाकारले आहे.*

*आसाम गण परिषद, बोडोलँड पीपल्स फ्रंट हे आसाममधील स्थानिक पक्ष आहेत. ते भाजपसोबत एनडीएच्या माध्यमातून लढले आहेत. आसाममधील १२६ जागापैकी भाजपला ८२ जागांवर विजय मिळाला आहे. तर आसाम गण परिषद आणि बोडोलँड पीपल्स फ्रंट प्रत्येकी १० जागांवर विजय मिळाला आहे. भाजप काही वर्षांनी स्थानिक राजकीय पक्षांना कसा गिळंकृत करतो, हे आसाममध्येही दिसून आले आहे. आसाममध्ये 'मामा' आणि 'मियाँ' दोन शब्द काँग्रेसच्या पराभवास कारणीभूत ठरले. मतांचे धार्मिक ध्रुवीकरण साधण्यात आसाममध्ये यश आले. केंद्रशासित पुदुचेरीमध्ये एनडीएने बहुमताचा आकडा पार केला आहे. पुदुचेरीमध्ये २०२१ मध्ये एनआरसी आणि भाजप यांच्या एनडीएने सहा जागांवर विजय मिळवला होता. मात्र, ९ जागा मिळवलेल्या काँग्रेसला बाजूला करत १५ अपक्षांशी मैत्री करत भाजपने सत्ता स्थापन केली होती. राजकारणात अनेक घडामोडी होत असतात. या निवडणुकीत भाजपच्या भगव्या नकाशात पश्चिम बंगालचा समावेश झाला तर काँग्रेसला केरळची लॉटरी लागली. काँग्रेससाठी ही बाब नक्कीच आत्मविश्वास वाढवणारी आहे.*

# सातपुडा पर्वतरांगेत पेटला वणवा

## वनविभागाची रात्रंदिवस धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मोर्शी–** तालुक्यातील चिंचोली गवळीपासून केवळ दीड किलोमीटर अंतरावर मध्य प्रदेशाची सीमा सुरू होत असून याच सीमेलगत असलेला दक्षिण सातपुडा पर्वत सध्या भीषण वणव्याच्या विळख्यात सापडला आहे. गेल्या तीन वर्षांपासून या पर्वतरांगांमध्ये कुठल्याही प्रकारची आग लागली नव्हती. त्यामुळे वनविभागासह परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. शासनानेही सलग तीन वर्षे आग न लागल्याने येथील नागरिकांना प्रोत्साहनपर मोबदला दिला होता. मात्र यंदाच्या वाढत्या उष्णतेमुळे सातपुड्याच्या जंगलात पुन्हा एकदा आगीचे संकट उभे ठाकले आहे.



सध्या सातपुडा पर्वतातील अंबादेवी, खोखरा, गारगोटीचा जंगलपट्टा, सालबर्डी परिसर, गायमुख परिसर आदी भागांत मोठ्या प्रमाणात जंगलाला आग लागली असून आगीने भीषण रूप धारण केले आहे. या आगीमुळे महाराष्ट्र व मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांतील सीमेलगतच्या गावांना उष्णतेच्या लाटेचा मोठा फटका बसत आहे. दिवसभर अंगाची लाही लाही करणारी उष्ण हवा आणि गरम वाफांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. वनविभागाचे कर्मचारी, वनरक्षक आणि वनमित्र आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न करत आहेत. मात्र सातपुड्याचा डोंगराळ आणि दुर्गम भूभाग, त्यात सतत वाहणारे पहाडी वारे यामुळे आग विझवण्याचे काम अत्यंत कठीण ठरत आहे. एका ठिकाणी आग नियंत्रणात आली की, वार्याच्या झोताने दुसर्या ठिकाणी ती पुन्हा भडकत असल्याने वन कर्मचार्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.विशेष म्हणजे मध्य प्रदेश वनविभागाचे कर्मचारी आणि वनमित्रही रात्रीच्या वेळी जंगलात उतरून आग विझवण्या साठी अथक परिश्रम घेत आहेत. जीव धोक्यात घालून सुरू असलेल्या या मोहिमेमुळे दोन्ही राज्यांच्या वनयंत्रणेची झुंज अधिक तीव्र झाली आहे.

# दीड वर्षानंतर मोबाईल मिळाला परत

## बाजारात हरविला होता मोबाईल, पथ्रोट पोलिसांचा तपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५पथ्रोट**

येथील आठवडी बाजारातून हरविलेला मोबाईल पोलिसांच्या तपासामुळे दीड वर्षानंतर परत मिळाला. सदरचा मोबाईल त्यांनी मूळ मालकाला दिल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. एकवीरा पतसंस्थेचे व्यवस्थापक मनीष वर्मा हे शुक्रवार या आठवडी बाजाराच्या दिवशी भाजीपाला व इतर दैनंदिन वस्तू खरेदी करण्याकरिता गेले होते. या बाजारात त्यांचा १५ हजार रुपये किमतीचा मोबाईल हरविला होता. याबाबत त्यांनी पोलिस ठाण्यात नोंद केली होती. सदर घटनेची दखल घेत पोलिसांनी ठाणेदार अभय चौथनकर यांच्या मार्गदर्शनात मोबाईल क्रमांक ट्रेकिंगवर टाकला होता. त्यानंतर सुरवातीला मध्य प्रदेश व तेथून थेट मुंबई, याठिकाणी मोबाईल पोहोचल्याचे पोलिसांच्या रेकॉर्डवर आले. त्यानुसार ज्या व्यक्तीकडे मोबाईल होता त्याच्याशी पोलिसांनी संपर्क साधला असता त्या व्यक्तीने कुरिअरद्वारे त्यांच्यापर्यंत हा मोबाईल पोहोचविला. मोबाईल मिळताच पोलिस कर्मचारी अपर्णा लाहोट व अमन खरात यांनी मूळ मालक मनीष वर्मा यांना तो सुपूर्द केला. दीड वर्षानंतर मोबाईल परत मिळाल्याचा आनंद झाला असून याचे पूर्ण श्रेय पोलिसांना जाते, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केला .



# जमीन आरक्षण प्रकरणात हस्तक्षेप आमदार यावलकरांना भोवणार; उच्च न्यायालयाचे ताशेरे

## राजकीय प्रभावाचा वापर करून आदेशावर स्थगिती; नागपूर खंडपीठाचे परखड निरीक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** जमीन आरक्षणाच्या प्रकरणात कोणताही थेट संबंध नसतानाही हस्तक्षेप केल्यामुळे मोर्शी–वरुड मतदारसंघाचे आमदार उमेश यावलकर यांच्यावर मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी तीव्र ताशेरे ओढले आहेत. राजकीय प्रभावाचा वापर करून प्रशासकीय निर्णयात हस्तक्षेप झाल्याचे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले.वरुड शहराच्या विकास आराखड्यात सुभाषचंद्र खुराणा यांची २.२३८ हेक्टर जमीन आठवडी बाजारासाठी आरक्षित करण्यात आली होती. मात्र, नगर परिषदेकडून तब्बल १८ वर्षे ही जमीन संपादित करण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नाही. त्यामुळे नगर रचना संचालकांनी १० ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्याच्या कलम १२७ अंतर्गत आदेश देत संबंधित आरक्षण रद्द झाल्याचे घोषित केले.या आदेशाविरोधात कोणत्याही संबंधित प्राधिकरणाने न्यायालयात आव्हान दिले नसल्याने तो अंतिम ठरला. तरीही, आमदार यावलकर यांच्या प्रभावामुळे नगर विकास सचिवांनी १७ ऑक्टोबर २०२५ रोजी कोणतेही वैध कारण नसताना त्या आदेशावर स्थगिती आणणारे पत्र जारी केले.दरम्यान, खुराणा यांनी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या प्रकरणात आमदार यावलकर, नगरसेवक किरण सावरकर आणि व्यावसायिक स्वप्निल बेलसरे यांनी संबंधित जमिनीशी कोणताही संबंध नसतानाही हस्तक्षेप करत आरक्षण रद्द करण्यास विरोध दर्शवला.यावर सुनावणी करताना न्यायालयाने नमूद केले की, नगर विकास सचिवांनी राजकीय दबावाखाली वादग्रस्त कृती केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. अशा प्रकारचा हस्तक्षेप न्यायप्रक्रियेच्या तत्वांना बाधक असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने संबंधितांवर कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली.



# केवायसीच्या नावावर दोन लाखांचा गंडा

## यावली शहीद येथील वृध्देची फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** आपल्या शेतीबाबत केवायसी करायची आहे, त्यासाठी आधारकार्ड द्या, असे म्हणून वृध्द महिला आधारकार्डसाठी दुसऱ्या खोलीत जाताच गादीखाली ठेवलेले २ लाखांचे दागिने घेऊन भामटे पसार झाले. यावली शहीद येथे ही घटना रविवारी (ता. तीन) सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली.



प्राप्त माहितीनुसार, यावली शहीद येथील रहिवासी सुमन हरिराम धर्माळे (वय ७०) या घरात एकटी होत्या. सकाळी १० वाजताच्या सुमारास दोन भामटे तिच्या घरी पोहोचले. तिला शेतीबद्दल केवायसी करायची आहे. त्याकरीता आधारकार्ड हवे, असे म्हटल्यानंतर तिने घरातील दुसऱ्या खोलीत जावून आधारकार्ड आणले. यावेळी भामटे निघण्याच्या तयारीत होते. त्यांनी केवायसी करून घ्या, असे म्हणून निघून गेले. घरातील काम आटोपल्यानंतर महिलेने दिवानच्या गादीखालील ठेवलेले दागिने पाहिले असता बेपत्ता आढळले. त्यात १५ ग्रॅम वजनाचा एक सोन्याचा हार किंमत अंदाजे १.५३ लाख, १४ ग्रॅम सोन्याची पोत किंमत अंदाजे ५० हजार असा एकूण २ लाख ३ हजारांच्या ऐवजावर भामट्यांनी हात साफ केल्याचे आढळून आले. महिलेने माहुली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. त्या आधारे अज्ञात दोन भाम्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

## नगरपरिषदेची नोटीस

# भाडेकरूची घरमालकास मारहाण

## १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती** उमेश रामरावजी ब्राह्मणे यांनी ललित केशव सोरटे यांच्या मालकी हक्काचे वरूडातील सरस्वतीनगर परिसरातील टिनाचे शेड भाड्याने घेतले. भाड्याचे पैसे दिले नाही म्हणून शेड मालकांच्या कुटुंबीयांनी ३ मे रोजी ब्राम्हणे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण शिवीगाळ केली, अशी तक्रार उमेश ब्राह्मणे यांनी पोलीसात दिली. याप्रकरणी ललित उर्फ चित्तरंजन केशवराव सोरटे (४६) व त्याची व पत्नी, अमरावती येथील ४० वर्षीय महिला, ललितची बहिण, जावाई, भाची यांच्याविरूद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले. तसेच मंगला चित्तरंजन सोरटे हिने उमेश ब्राह्मणे याला त्यांच्या मालकीचे टिनाचे शेड भाड्याने दिले होते. परंतु, नगर परीषद प्रशासनाने ते शेड अवैध असल्याची नोटीस मंगला सोरटे यांना दिली.



याबाबत सोरटे यांनी ब्राम्हणे यांना नगरपरिषदेने पाठवलेल्या नोटीसबाबत अवगत केले व शेड काढण्यास सांगीतले. तेव्हा त्यांनीते शेड तुम्हीच काढुन घ्या, असे म्हटले, परंतु जेव्हा शेड काढण्यासाठी सोरटे गेले तेव्हा ब्राह्मणे यांनी मंगला सोरटे, तिचा पती व तिच्या मैत्रिणीला शिवीगाळ व मारहाण केली. अट्रासिटीचा खोटया गुन्ह्यात तुला फसवतो, अशी धमकी दिली. याप्रकरणी सोरटे यांनी वरूड पोलिसांत ६ आरोपीविरूद्ध तक्रार दाखल केली.

याप्रकरणी उमेश ब्राह्मणे (३७), किशोर ब्राम्हणे (३६), ३ मिहिला, एक कामगार यांचेविरूद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

# कृषी मंत्र्यांसोबत आ. रवी राणांची बैठकीतून चर्चा

## रासायनिक खते, बी बियाणे समस्यावर उपाय योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती,**

अमरावती जिल्हा कृषि साहित्य विक्रेता सेवा संघ, अमरावती यांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व कृषी विक्री केंद्रे २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नुकतीच रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस संघटनेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सुमारे ४० सदस्य उपस्थित होते. तसेच जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, कृषि उपसंचालक वरुण देशमुख, कृषि विकास अधिकारी प्रविण खर्च, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विराग देशमुख तसेच कृषि अधिकारी (गुणनियंत्रण) शुद्धोधन वरघट उपस्थित होते. शेतकरी प्रतिनिधी सुनील राणा, मंगेश पाटील इंगोले, अजय घुले, उमेश ढोणे व युवा स्वाभिमान पक्षाचे प्रमुखपदाधिकारी उमेश डकरे, सुनील नीचत व शेतकरी उपस्थित होते. उत्पादक संघटनेच्या निवेदनात रासायनिक खत पुरवठ्यातील बेकायदेशीर लिकींग बंद करणे, अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाण्यांवर बंदी घालणे, 'साथी' पोर्टलची सक्ती कंपन्यांनाहीलागू करणे,



रासायनिक खतांचा पुरवठा करणे, सॅम्पल फेल झाल्यास विक्रेत्यांना आरोपी न धरता साक्षीदार मानणे, गुणवत्ता तपासणीतील प्रलंबित रक्कम अदा करणे तसेच अवैध व निकृष्ट दर्जाच्या कृषी इनपुट्सवर नियंत्रण ठेवणे अशा विविध प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

बैठकीदरम्यान जिल्हास्तरावरील मागण्यांवर सविस्तर चर्चा करून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी समाधानकारक तोडगा काढल्याचे सांगण्यात आले. तर राज्यस्तरीय मागण्यांबाबत आ. रवी राणा यांनी कृषीमंत्र्यांसोबत दूरध्वनीद्वारे संपर्क साधून खत लिकींग, युरियावडीएपी खतांवरील किमान विक्री अट शिथिल करणे तसेच 'साथी' पोर्टल संदर्भातील अटींबाबत माहिती दिली.यावर वरिष्ठ स्तरावर तातडीने बैठक घेऊन संबंधित विषय निकाली काढण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व विक्रेता संघटनांनी बैठक यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त करत आ. रवी राणा यांचे आभार मानले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# लक्ष्यांक निश्चितीपूर्वीच पीककर्ज वितरण

## जिल्हा सहकारी बँकेकडून आठ हजार २०९ सभासदांना १२० कोटींचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** खरीप हंगाम २०२६–२७ साठी पीककर्ज वितरणाचे लक्ष्यांक निश्चित झालेले नसले तरी पीककर्ज वितरणास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने प्रारंभ केला आहे. एक एप्रिलपासून आतापर्यंत जिल्ह्यातील आठ हजार २०९ सभासदांना १२०.७७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. यंदा गतवर्षीच्या पीककर्ज दरात सरसकट बारा टक्के वाढ करण्याची शिफारस अग्रणी बँकेकडून करण्यात आली आहे. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीस प्रारंभ झाला आहे. कर्जमाफी योजनेच्या पार्श्वभूमीवर पीककर्जासाठी बँकांकडे शेतकऱ्यांच्या चकरा सुरू झाल्या असल्या तरी लक्ष्यांक निश्चित नसल्याने व कर्जमाफीचे निकष अद्याप स्पष्ट नसल्याने कर्ज वितरणात अडचणी जाऊ लागल्या आहेत. दरम्यान जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नियमित व कर्जमाफीतील नवीन सभासदांना एक एप्रिलपासून पीकनिहाय कर्ज वितरित केले आहे. जिल्ह्यातील २७३ सेवा सहकारी संस्थांतर्गत आठ हजार २०९ सभासदांना १२०.७७ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. हे कर्ज नियमित कर्ज भरणाऱ्यांना देण्यात आले. राष्ट्रीय व खासगी क्षेत्रातील बँकांनी अद्याप कर्ज वितरणासंदर्भातील भूमिका स्पष्ट



केलेली नाही.

निकष स्पष्ट नाही, बँका अडचणीत राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचे निकष स्पष्ट केलेले नाही. परदेशी समितीला दिलेली मुदत संपुष्टात आली असतानाही राज्य सरकारकडून कर्जमाफीसंदर्भात काहीच हालचाली नसल्याने शेतकऱ्यांसह बँकाही अडचणीत सापडल्या आहेत. गत हंगामातील थकीत कर्जाची वसुली रखडली आहे. अनेक खाते एनपीएमध्ये जाऊ लागले आहेत. गतवर्षी दोन लाख ७३ हजार ३०० सभासदांसाठी २१०० कोटी रुपयांचे लक्ष्यांक निश्चित करण्यात आले होते. कर्जमाफी योजनेचे निकष स्पष्ट झाल्यावरच बँकांची थकीत रकमेची स्थितीही स्पष्ट होणार आहे.

यंदाच्या हंगामातील कर्ज वितरणाची स्थिती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक एकूण संस्था : २७३, नियमित सभासदांना कर्ज वाटप : ८, २०९ कर्ज वितरणाची रक्कम : १२०.७७ कोटी, हेक्टर क्षेत्र : १४, ३११

# ५५३ ग्रा.पं.ची प्रभागरचना प्रसिद्ध

## राज्य निवडणूक आयोगाने दिली मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती १०**





**तालुकानिहाय ग्रामपंचायती**

धारणी३५, चिखलदरा : २३, अचलपूर : ४३, दर्यापूर : ४९, अंजनगावसुर्जी : ३४, अमरावती : ४६, भातकुली : ३६, नांदगाव खंडेश्वर : ५१, चांदूररेल्वे : ३०, धामणगावरेल्वे : ५५, तिवसा : ३०, वरुड : ४१, मोर्शी : ३९, चांदूरबाजार : ४१

जिल्ह्यातील ५५३ ग्रामपंचायतींच्या प्रभागरचनेवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. ही प्रभागरचना सार्वत्रिक निवडणुकांकरिता लागू राहणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या प्रभागरचनेस अंतिम मंजुरी प्रदान करून प्रसिद्ध केली आहे. जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या एकूण ५५३ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागरचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. या प्रक्रियेंतर्गत प्रभागरचना अंतिम करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाकडे मंगळवारी प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास आयोगाने मान्यता देत अंतिम प्रभागरचना अंतिम प्रसिद्ध केली आहे. जिल्ह्यातील ५५३ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ १० ते १७ फेब्रुवारी दरम्यान संपुष्टात आला आहे. या ग्रामपंचायतींवर सध्या सरपंच प्रशासक असून उपसरपंच व सदस्य प्रशासकीय समितीमध्ये आहेत. या ग्रामपंचायतींवर निवडणूक लावण्याच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाकडून प्रभागरचनेचा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. या अंतर्गत आतापर्यंत प्रभागरचना निश्चित करून यावर सात ते १३ एप्रिलदरम्यन हरकती स्वीकारण्यात आल्या. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून या हरकतींसंदर्भात सुनावणी घेण्यात आल्यानंतर ते प्रस्ताव अंतिम मंजुरीकरिता आता राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आले होते. आयोगाने सोमवारी या प्रभागरचनेस मान्यता दिल्याने ५५३ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा मार्ग सुकर झाला आहे.

# मतदारयादी मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावे– जिल्हाधिकारी आशिष येरेकर





## जिल्हा नियोजन भवनात आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**


निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरावलोकन जाहीर केला आहे. त्यानुसार याआधी मतदारांची मॅपिंग करण्यात येत आहे. यात मतदारांची मॅपिंग झाली नसल्यास त्यांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हा नियोजन भवनात मतदारांच्या मॅपिंगबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, महापालिकेचे उपायुक्त महेश देशमुख, योगेश पिटे, तहसीलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी निवडणूक आयोगाने नेमून दिलेले कार्य वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. विशेष संक्षिप्त पुनरावलोकन कार्यक्रमाची जबाबदारी बीएलओवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे सध्याच्या मतदारयादीतील मतदारांचे नाव २००२ च्या मतदारयादीत शोधावे लागणार आहे. यासाठी प विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे बीएलओंनी प्रत्येक मतदारांचा शोध घेऊन मॅपिंग करणे आवश्यक आहे. मॅपिंगची टक्केवारी कमी झाल्यास उर्वरीत मतदारांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. हे काम अत्यंत जिकरीचे होणार असल्याने बीएलओंनी मॅपिंगची टक्केवारी वाढविणे आवश्यक आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने बडनेरा आणि अमरावती, या शहरी भागात मॅपिंगची गती वाढविणे आवश्यक आहे. मतदारांची मॅपिंग झालेली नसल्यास मतदारयादीतील नाव वगळण्याआधी मतदारांकडून फॉर्म नं. सात भरून घेण्याची कारवाई करावी. कमी मॅपिंग झालेल्या क्षेत्रातील मॅपिंगची टक्केवारी वाढविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ पुरविले जाणार आहे. त्यामुळे येत्या १५ मे पर्यंत ९५ टक्के मॅपिंग होण्यासाठी बीएलओंनी प्रयत्न करावेत. मॅपिंगच्या कामी खासगी संस्थांमधील कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित संस्थांनाही पत्र देऊन बीएलओंना शाळेतील कामामधून सूट देण्याची सूचना करण्यात येणार आहे. मॅपिंगच्या कामात अडथळा आणल्यास संबंधित बीएलओंवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे बीएलओंनी मॅपिंगचे काम काटेकोरपणे पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले. सुरवातीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी मतदारांच्या मॅपिंगबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी मॅपिंगचे कार्य उत्कृष्टरीत्या केलेल्या बीएलओंनी मनोगत व्यक्त केले.

# दोन हजारांवर प्रवेश निश्चित

## आठ मे पर्यंत मुदतवाढ

आतापर्यंत जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून प्रवेशाची मुदत आठ मे पर्यंत वाढविण्यात आली आहे. शाळांना प्रवेशासाठी १० मे पर्यंतची मुदत देण्यात आली असून त्यानंतर प्रतीक्षायादीतील विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया घेतली जाईल.

**–संगीता सोनोने,** शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग, जि. प.





**आरटीई प्रवेशाची स्थिती**

एकूण शाळा : २२७

एकूण जागा : २६२६

प्राप्त अर्ज : ७९५३

सोडतीमधील विद्यार्थी : २५८६

प्रवेश निश्चिती : १९१८

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती** – मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) अमरावती जिल्ह्यात आतापर्यंत एक हजार ९१८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. प्रवेशाची मुदत वाढवून ती आता आठ मे करण्यात आल्याने पालकांना प्रवेशासाठी आणखी वेळ मिळणार आहे. विशेष म्हणजे, यंदाही बहुतांश पालकांचा ओढा नामांकित शाळांकडेच असल्याने प्रवेशप्रक्रिया काहीशी संथगतीने होत आहे. आरटीई अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील २२७ शाळा या प्रवेशप्रक्रियेकरिता पात्र ठरल्या. २६२६ जागांसाठी तब्बल सात हजार ९०० ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले. त्यामुळे यंदा स्पर्धा वाढली होती. २५८६ विद्यार्थ्यांना सोडतीद्वारे प्रवेशाची संधी मिळाली असून तेवढीच प्रतीक्षायादी तयार करण्यात आली आहे. आतापर्यंत जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याचे शिक्षण विस्तार अधिकारी संगीता सोनोने यांनी सांगितले. आणखी चार दिवसांत प्रवेशाची संख्या वाढण्याची शक्यता शिक्षण विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# चांदूरबाजारचे विस्तार अधिकारी कमलेश पाचपुते निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चांदूरबाजार–** शासकीय कामकाजात निष्काळजीपणा आणि नियमांची पायमल्ली करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अखेर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. चांदूरबाजार येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे विस्तार अधिकारी कमलाकर ज्ञानबाराव पाचपुते यांना कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत जिल्हा परिषद प्रशासनाने निलंबित केले आहे.प्राप्त माहितीनुसार, पाचपुते हे चांदूरबाजार येथे असताना त्यांनी आपल्या पदाच्या जबाबदाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले. वारंवार सूचना देऊनही कामकाजात सुधारणा न झाल्याने आणि शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्याने ही कारवाई करण्यात आली.या प्रकरणात महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (वर्तणूक) नियम १९६७ तसेच संबंधित शिस्तभंग नियमां च्या बरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे, असे सांगत जिल्हा परिषद अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी निलंबनाचे आदेश पारित केले.निलंबन कालावधीत पाचपुते यांना नियमानुसार निर्वाह भत्ता देण्यात येणार असून त्यांना धारणी मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून दोष अधिक गंभीर व्यक्त केली जात आहे. आढळल्यास पुढील कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ऐतिहासिक विजयाचा अमरावतीत जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ अमरावती** १भारतीय जनता पार्टीच्या पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी येथील विधानसभा निवडणुकांमधील विजयाचा अमरावतीत जल्लोषपूर्ण उत्सव साजरा करण्यात आला. स्थानिक राजापेठ येथील पक्ष कार्यालयासमोर झालेल्या या जल्लोषात कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे व ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या जल्लोषात कार्यकर्त्यांनी ढोल–ताशांच्या गजरात नृत्य करत, घोषणाबाजी करत कायकर्त्यांनी वातावरण भारावून टाकले. या विजयामुळे देशातील जनतेनेपुन्हा एकदा पंतप्रधानांच्या नेतृत्वावर विश्वास दाखविल्याचे मत यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख व शहराध्यक्ष नितीन धांडे यांनी भाषणातून सांगितले की, हा विजय केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, देशाच्या विकासाभिमुख राजकारणावर जनतेने शिक्कामोर्तब केल्याचे प्रतीक आहे. केंद्र सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला असून, त्याचाच परिपाक म्हणून हा निकाल लागल्याचे त्यांनी नमूद



केले. आगामी काळातही पक्ष संघटन अधिक मजबूत करून जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई वाटून आनंद साजरा केला. विशेष आकर्षण म्हणूनबंगालमध्ये प्रसिद्ध असलेला झालमुरी हा पदार्थही उपस्थितांना वाटण्यात आला. ज्यामुळे या जल्लोषाला वेगळीच रंगत आली.भाजपाचे ध्वज हातात घेऊन कार्यकर्त्यांनी विजयाचा प्रचंड जयघोष केल्याने परिसर दुमदुमून गेला होता. जहा जन्मे मुखर्जी वो बंगाल हमारा है, मोदी है तो मुनकीन है, भाजपाचा विजय असो अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. या जल्लोषात नगरसेवक संजय नरवणे, ॲड. प्रशांत देशपांडे, मिलिंद बांबल, बंडू हिवसे, राधा कुरील, पद्मजा कौंडण्य, सुरेखा लुंगारे, संजय तिरथकर, गंगा खारकर, तसेच सरचिटणीस बादल कुळकर्णी, सुमीत पवार, तसेच सदूभाऊ मुंशी, राजू कुरील, दिपक पोहेकर, सचिन रासने, सुनील खराटे, प्रणीत सोनी, भारत चिखलकर, राजेश पड्डा, राजेश आखेगांवकर, आकाश पाटील, सुनील तायडे, संगीता गायकवाड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते हजर होते.

# मोझरी– डवरगाव मार्गावर चार ठिकाणी खोदकाम : वाहनचालकांचे जीव धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मोझरी –** गुरुकुंज मोझरी ते डवरगाव या सुमारे १३ किलोमीटर लांबीच्या डांबरी रस्त्यावर चार ठिकाणी रस्ता फोडून ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे. सार्वजनिक मालमत्तेचे खुलेआम नुकसान होत आहे. हे काम कोण करत आहे, त्याचा शोध घेऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर शेती, वीटभट्ट्या तसेच एमआयडीसी परिसर आहे. त्यामुळे औद्योगिक व व्यावसायिक हालचाली वाढल्या आहेत. विविध उद्योगांसाठी पाण्याची गरज भागवण्यासाठी काहींनी एका बाजूचे पाणी दुसऱ्या बाजूला नेण्यासाठी थेट रस्ता खोदण्याचा मार्ग स्वीकारला आहे. परिणामी, रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे व तुटलेले भाग निर्माण झाले आहेत. अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे. मात्र नेमका रस्ता कोणी फोडला, त्यासाठी परवानगी घेतली होती किंवा नाही, याबाबत कोणतीही ठोस माहिती नाही. मात्र फोडलेल्या रस्त्यामुळे



दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका वाढला आहे. वारंवार धक्के बसल्यामुळे पाठीच्या कण्यासंबंधित आजार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी हे धोके अधिक वाढतात. स्थानिक नागरिकांच्या मते, आजपर्यंत रस्ता फोडणाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे संबंधितांना दंडाची भीती राहिलेली नाही. परिणामी, कोणीही मनमानी पद्धतीने रस्ता खोदत आहे. कायदेशीरदृष्ट्या पाहता, सार्वजनिक रस्ता विनापरवाना फोडणे हा गंभीर गुन्हा आहे. 'सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा' अंतर्गत संबंधितांविरुद्ध कारवाई होऊ शकते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार अशा प्रकरणात मोठा दंड आकारला जातो. रस्ता पूर्ववत करण्याचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल केला जातो. कोणत्याही तांत्रिक कामासाठी (जसे पाणी पाइपलाइन, केबल टाकणे इ.) रस्ता खोदणे आवश्यक असल्यास संबंधित विभागाकडून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी आवश्यक शुल्क व अनामत रक्कम भरावी लागते. परवानगी मिळाल्यानंतरच काम सुरू करता येते. काम पूर्ण झाल्यावर रस्ता पूर्वस्थितीत आणणे ही संबंधित व्यक्ती किंवा संस्थेची जबाबदारी असते.

# बनावट जनगणना अर्जात माहिती भरु नका

## लिंक्सपासून दूर राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चांदूरबाजार,** देशाचे नियोजन, विकासवकल्याणकारी योजनांसाठी अत्यंत महत्त्वाची असणारी जनगणना प्रक्रिया सध्या सुरू झाली आहे. पण या जनगणनेच्या नावाखाली सोशल मीडियावर काही बनावट ऑनलाइन अर्ज व लिंक फिरत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. या प्रकरणी नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता असल्यामुळे सरकारने नागरिकांना अशा लिंक पासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.नागरिकांनी सरकारने दिलेल्या संकेतस्थळाशिवाय इतर कोणत्याही लिकवर माहिती भरू नये, असे आवाहन सरकारने केले आहे. देशाच्या विकासाचा आराखडा ठरवणाऱ्या जनगणना उपक्रमाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. यदा प्रथमच नागरिकांना स्व–गणना नोंदविण्यासाठी



डिजिटल सुविधेद्वारे स्वतःची माहिती स्वतः नोंदवण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामुळे जनगणना प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित होणार असल्याचाविश्वासप्रशासनानेव्यक्त केला आहे. सोशल मीडियावर या प्रक्रीयेचा एक बोगस अर्ज व्हायरल झाला आहे.सरकारने नागरिकांना या अर्जापासून दूर राहण्याचा सल्ला देत सरकारने निश्चित केलेले संकेतस्थळ व अँपद्वारेच आपली माहिती भरण्याचे आवाहन केले आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने पोस्टद्वारे जनतेला जनगणना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.सरकारने स्व–गणना करण्यासाठी १ मे ते १५ मे हा कालावधी निश्चित केला आहे. या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने आपली व आपल्या कुटुंबाची माहिती भरता येणार आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत घरयादी व घरगणना टप्पा पार पडणार आहे. या कालावधीत नागरिकांनी स्वतःहून माहिती भरल्यास, पुढील प्रक्रिया गणनकांच्या प्रत्यक्ष गृहभेटीत अधिक सुलभव जलद पद्धतीने होईल. या पार्श्वभूमीवर सरकारच्या माहिती व जनसंपर्क विभागाने नागरिकांना सोशल मीडियावर फिरणाऱ्या बोगस अर्जापासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

# जलजीवन व स्वच्छ भारत अभियानच् कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी असहकार

## मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करण्याची मागणी; या महिन्यापासून आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत राहिल्याने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. कर्मचाऱ्यांनी २० एप्रिलपासून राज्यव्यापी असहकार आंदोलन सुरू केले असून आता मेपासून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

माहितीनुसार, जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ५ महिन्यांचे, तर स्वच्छभारत अभियान अंतर्गत ३ महिन्यांचे मानधन थकीत आहे. वेतन वेळेवर न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असून घरखर्च, शिक्षण व आरोग्य खर्च भागवणे कठीण झाले आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी थकीत मानधन तात्काळ देण्याचे आदेश दिले होते. तसेच मानवाधिकार आयोगानेही वेतन त्वरित देण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र अद्याप यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

जिल्ह्यात जलजीवन मिशन व स्वच्छ भारत अभियानात ३००० अधिकारी, कर्मचारी काम करतात. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीमुळे राज्यात आतापर्यंत ३८,८०५ गावे ओडीएफ प्लस तर १४,४७२ गावे हर घर जल म्हणून घोषित झाली आहेत. तरीही कर्मचाऱ्यांना मूलभूत वेतनासाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. फेब्रुवारीतील आंदोलनानंतरही स्थितीत सुधारणा न झाल्याने आता कर्मचाऱ्यांनी अहवाल सादरीकरण, बैठका व व्हिडिओ कॉन्फरन्सवर बहिष्कार टाकत असहकाराचा मार्ग स्वीकारला आहे. मे २०२६ पासून आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. आंदोलन काळात वेतन कपात करू नये, अशीही मागणी करण्यात आली आहे. वेतनवाढीच्या मुद्यावर, तालुकास्तरीय कर्मचाऱ्यांचे मानधन वाढले असताना जिल्हास्तरीय कर्मचाऱ्यांचे वेतन २०१२ पासूनच स्थिर असल्याची बाब समोर आली आहे. तसेच आकृतीबंध प्रस्तावास तत्त्वतः मान्यता असूनही अंमलबजावणी रखडली आहे. २८ एप्रिल रोजी कृती समितीने प्रधान सचिवांकडे प्रस्ताव सादर करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

### प्रस्तावानंतर आंदोलनाचा टप्पा बदलणार

प्रधान सचिव पराग जैन सुट्टीवर असून ते रुजू झाल्यानंतर वेतनासाठी निधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे जाणार आहे. प्रस्ताव सादर होताच लेखणीबंद आंदोलन शिथिल करून काळ्या फिती लावून आंदोलन सुरू ठेवले जाईल. प्रस्ताव नाकारल्यास मुंबईत कुटुंबासह तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.न्यायालय व मानवाधिकार आयोगाच्या आदेशानंतरही मानधन दिले जात नाही, ही गंभीर बाब आहे. मुख्यमंत्री यांनी तातडीने हस्तक्षेप करावा.

**– रमाकांत गायकवाड, अध्यक्ष कृती समिती.**

# खोलापूर घटनेवर संताप

## खासदारांची पोलीस अधीक्षकांशी भेट

### महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील खोलापूर परिसरात घडलेल्या कथित छेडछाडीच्या घटनेनंतर संपूर्ण भागात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. चार युवकांनी दोन महिलांसोबत अश्लील वर्तन केल्याचा आरोप असून, त्यांना विरोध केल्यावर एका गर्भवती महिलेवर निर्दयी मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या गंभीर प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी खाटीक समाजाच्या प्रतिनिधीमंडळासह जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी जिल्ह्यातील महिलांच्या सुरक्षेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. विशेषतः अनुसूचित जाती व जमातीतील महिलांना लक्ष्य करून अशा प्रकारच्या घटना घडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.डॉ. बोंडे यांनी पोलीस प्रशासनाकडे मागणी केली की, या प्रकरणातील आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच परिसरात पोलीस गस्त वाढवून महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, जेणेकरून भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत.दरम्यान, पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली असून, दोषींविरुद्ध योग्य व कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, नागरिकांकडून ठोस उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अतिवृष्टी, नापिकीमुळे वाढले कर्जाचे डोंगर

## यावर्षी शेती कशी करावी? बळीराजा समोर गंभीर प्रश्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती–** सतत बदलणारे हवामान, कधी अतिवृष्टी तर कधी, अवकाळी पाऊस, गारपीट आणि रोगराई, यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकर्!यांवर कर्जाचे डोंगर वाढत चालले आहे. अशा परिस्थितीत यावर्षी शेती कशी करावी, हा मोठा प्रश्न शेतकर्!यांसमोर उभा आहे.

यंदाच्या हंगामातही वातावरणातील अनिश्चितता कायम असल्याने शेतकरी संभ्रमात आहे. बी-बियाणे, खतं, औषधी, मजुरी आणि ट्रॅक्टर, नागरटी दरात मोठी वाढ झाली असून उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. मात्र, शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकर्!यांच्या हातात काहीच राहत नाही. परिणामी, अनेक शेतकर्!यांना खासगी सावकार किंवा बँकांकडून कर्ज घ्यावे लागत आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी पावसाअभावी पिके करपली. सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, गहू यांसारख्या प्रमुख पिकांना फटका बसला. शासनाकडून मदत जाहीर झाली तरी ती अपुरी व उशिराने मिळाल्याने शेतकर्!यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. काही तज्ज्ञ शेतकर्!यांच्या मते, यावर्षी शेतकर्!यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन कमी खर्चिक व कमी पाण्यावर येणार्!या पिकांकडे वळणे गरजेचे आहे. तसेच, ठिबक सिंचन, सेंद्रिय शेती, पीकपद्धतीत बदल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज बनली आहे. दरवर्षी निसर्गाचा लहरीपणा वाढत आहे. एकीकडे नापिकी तर दुसरीकडे कर्जफेडीचा ताण. शेती करावी की नाही, असा प्रश्न शेतकर्!यांमध्ये निर्माण झाला आहे.नापिकीने कर्जबाजारी झालेले शेतकरी मानसिक तणावात आहेत. शासनाने शेतकर्!यांना तातडीने कर्जमाफी, पीकविमा रक्कम, योग्य बाजारभाव, वीजबिल सवलत आणि सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शेतकर्!यांकडून केल्या जात आहे. निसर्गाचा मार, बाजारभावाचा घाव, अशा परिस्थितीत शेती करायची तरी कशी, यंदाचा हंगाम शेतकर्!यांसाठी कसोटीचा ठरणार असून योग्य नियोजन, शासनाची मदत आणि निसर्गाची साथ मिळाल्यासच शेतकरी या संकटातून सावरू शकणार आहे.

# मान्सूनपूर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट बंधनकारक

## १५ मेपूर्वी अहवाल सादर करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मान्सूनपूर्व सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आता बंधनकारक करण्यात आले असून १५ मेपूर्वी सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे जीर्ण आणि धोकादायक शाळा इमारतींचा प्रश्न वेळेत हाताळण्यास मदत होणार आहे.दरवर्षी पावसाळ्यात शाळांच्या जीर्ण इमारतींमुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये केवळ इमारतीची मजबुतीच नव्हे, तर तब्बल २७ महत्त्वाच्या निकषांवर शाळांची तपासणी केली जाणार आहे. यामध्ये छत, भिंती, पाया, वीज व्यवस्था, पाणी साचण्याची स्थिती, स्वच्छता आणि सुरक्षाव्यवस्था यांचा सखोल आढावा घेतला जाईल.शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली असून ही पथके प्रत्येक शाळेची प्रत्यक्ष पाहणी करतील. शाळांमधील वर्गखोल्या, स्वयंपाकगृह, स्वच्छतागृहे, गेट, दरवाजे, खिडक्या आणि खेळाचे मैदान यांचीही तपासणी केली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम इशारा प्रशासनाने दिला आहे.तपासणीत धोकादायक ठरलेल्या इमारती तात्काळ रिकाम्या करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पर्यायी सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येणार आहे. अतिजीर्ण आणि डळमळीत इमारतींचे पाडकाम करून नवीन इमारती उभारण्यालाही प्राधान्य दिले जाणार आहे.गतवर्षी अनेक जीर्ण शाळा इमारती पाडण्यात आल्या असून काही ठिकाणी नवीन बांधकाम पूर्ण झाले आहे. यंदा ही मोहीम अधिक वेगाने राबवली जाणार असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जातील. दरम्यान, खासगी शाळांनाही हे ऑडिट बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रात सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून मान्सूनपूर्व शाळांची स्थिती सुधारण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.



# मेळघाटात मोहफुलांचा गंध दरवळला

## संकलन तेजीत, पण ‘मोहा बँक’ कागदावरच!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मेळघाट–** मेळघाटातील आदिवासी पट्ट्यात सध्या मोहफुलांचा हंगाम बहरला असून, निसर्गाच्या या देणगीने स्थानिक आदिवासी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार दिला आहे. रोजगाराच्या संधी मर्यादित असलेल्या या भागात मोहफुलांचे संकलन हाच सध्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत ठरत आहे. मात्र, एकेकाळी गाजलेल्या ‘मोहा बँक’ प्रकल्पाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे आदिवासींच्या या हक्काच्या उत्पन्नात शाश्वत प्रगती होऊ शकलेली नाही.

मेळघाटात उन्हाळ्याची चाहूल लागताच मोहफुलांचा सुगंध आसमंतात पसरतो. पहाटेपासून महिला, पुरूष आणि मुले जंगलात जाऊन ही फुले वेचण्याचे काम करतात. पहाटेच्या वेळी ही फुले गळून पडतता. त्यामुळे सकाळी लवकर उठून मोहफुले गोळा करण्यासाठी जावे लागते. एका कुटुंबाकडून दिवसालाा साधारण १५ ते २० किलो मोहफुलांचे संकलन केले जाते. वेचलेली मोहफुले वाळवून त्याची विक्री केली जाते. सध्या बाजारात ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दर मिळत आहे. मात्र, हे काम जोखमीचे असते. मोहफुले हे अस्वलांचे प्रिय खाद्य असल्याने, ही फुले वेचताना वन्यप्राण्यांच्या हल्लयाचा धोका वाढला आहे. पहाटेच्या अंधारात फुले वेचताना अस्वलाची सतत भीती वाटते, अशी भावना स्थानिक महिलांनी व्यक्त केली आहे.

‘पेसा’ कायद्यांतर्गत वनोपजावर मिळालेल्या अधिकारांमुळे स्थानिक ग्रामसभांची भूमिका या हंगामात महत्वाची ठरली आहे. मोहफुलांच्या विक्रीतून वर्षभरावी आर्थिक बेगमी करण्यासाठी आदिवासी बांधव प्रयत्नशील आहेत. उत्पादनांना अधिक चांगला भाव मिळावा, यासाठी शासनाने थेट खरेदी केंद्रे सुरू करावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### ‘मोहा बँके’चे पुनरुज्जीवन आवश्यक

काही वर्षांपुर्वी मोहफुलांच्या उत्पादनाला व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्यांनी ‘मोहा बँक’ ही संकल्पना मांडली होती. आदिवासींच्या उपजीविकेचे साधन म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात होते. मात्र, नंतर या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे प्रशासकीय स्तरावर दुर्लक्ष झाले. हा प्रकल्प पूर्णत्वास न गेल्याने आदिवासींना स्थानिक व्यापाऱ्यांवरच अवलंबून रहावे लागत आहे.

# धन्वंतरी सहकारी रुग्णालय निवडणुकीत विकासाच्या मुद्द्यांवर चुरस; १२ उमेदवारांना आघाडी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती :** २५शहरातील परवडणारी व दर्जेदार आरोग्यसेवा देणाऱ्या धन्वंतरी सहकारी रुग्णालयाच्या संचालक मंडळ निवडणुकीला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. २०२६-२०३१ या कार्यकाळासाठी होत असलेल्या निवडणुकीत विकास, पारदर्शकता आणि रुग्णसेवा उंचावण्याचे मुद्दे केंद्रस्थानी राहिले आहेत.संस्थेच्या सहा गटांतील १८ उमेदवारांपैकी १२ उमेदवारांना सदस्यांचा ठोस पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. उर्वरित उमेदवारांनीही माघार घेऊन संस्थेच्या प्रगतीसाठी सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे यंदाही बिनविरोध निवडीची परंपरा कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.उमेदवारांनी आधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, आरोग्य जनजागृती आणि रुग्णालयाचा दर्जा उंचावण्यावर भर दिला आहे. तसेच अत्याधुनिक साधनसामग्रीसह नवीन इमारतीचे बांधकाम करण्याचीही योजना मांडण्यात आली आहे.सुमारे २८०० सदस्य या निवडणुकीत मतदान करणार असून, रुग्णालयात कमी दरात उपचार, मोफत तपासणी व शस्त्रक्रिया सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. राजापेठ येथील पत्रकार परिषदेत प्रा. अशोक ठाकरे व डॉ. ओ. जी. मुंदडा यांनी ही माहिती दिली.–

# सायबर ठाण्यातील गैरकारभाराची अखेर विभागीय चौकशी; ९ पोलीस निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर :** तपास सोडून परस्पराच्या कामामध्ये लुडबुड करत आपल्याच सहकाऱ्यांना हाणामारी करण्यापर्यंत उतरलेल्या सायबर पोलीस ठाण्यातील गैरकारभाराची अखेर विभागीय पोलीस चौकशी केली जाणार आहे. चौकशीवर परिणाम होऊ नये, यासाठी गैरकारभाराचा ठपका ठेवण्यात आलेल्या ९ जणांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले. प्रशासन विभागाचे पोलीस उपायुक्त दिपक अग्रवाल यांनी या संदर्भात आदेश जारी केले.तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीराम सुतार, योगेश घारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय राणे, हवालदार सौरभ हिवरकर, श्रीकांत गणोकर सुनील चनगोले, सतीश वाघ, अजय पवार यांच्यासह राणेकडून मारहाण झालेला हवालदार प्रफुल्ल ठाकरे याचाही समावेश आहे.गेल्या महिन्याभरापासून शहरातील पोलीस दलात सायबर ठाण्यांमधील गैरप्रकार चर्चेचा विषय ठरला आहे. त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा डागाळली जात आहे. सायबर ठाण्याचे विभाजन झाल्यानंतरही वरिष्ठ पोलीस अधिकारी तपास करण्याचे सोडून परस्परांच्या कामात ढवळाढवळ करत असल्याचे प्रकार सातत्याने चव्हाट्यावर येत असताना पोलीस दलाची अब्रु वेशीला टांगली जात होती. हिरेन भोजवानी नावाच्या तक्रारदाराने सायबर पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवरून या अंतर्गत कलहाला तोंड फुटले होत. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर ठाण्यातील पथक तपासासाठी पुणे येथे गेले. त्या ठिकाणी १४ जणांना ताब्यात घेत चौकशी करण्यात आली. तीत क्रिकेट सट्टा बेटींगचे जाळे चव्हाट्यावर आले. एकांश नावाच्या बुकीने वेगवेगळ्या ४० हून अधिक बँक खात्यांमधून हवालाच्या २५० कोटींहून अधिक रकमेचे व्यवहार केल्याचे उघड झाल्यानंतरही पथकाने केवळ सुचनापत्रावर त्याला सोडून दिले. त्यामुळे एकांश फरार झाला.हा प्रकार कळताच दुसऱ्या गटातील सायबर अधिकाऱ्यांनी याची माहिती समाज माध्यमांवर व्हायरल केली. त्यावरून अंतर्गत कलहाचा भडका उडाला. या प्रकरणात राणे नावाच्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाने हवालदार ठाकरेचा भ्रमणदूरध्वनी हिसकावत त्याला मारहाण केली. ठाकरे याने याची तक्रार थेट सह पोलीस आयुक्तांकडे केली. त्या दिवसापासून ठाकरे दोन दिवस बेपत्ता झाला.सायबर शाखेतील हा प्रकार सातत्याने चव्हाट्यावर येत असल्याने पोलीस दलाची प्रतिमा वेशीला टांगली जात होती. त्याची दखल घेत पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांच्या आदेशानुसार पोलीस उपायुक्त अग्रवाल यांनी गैरप्रकाराचा ठपका ठेवलेल्या अधिकाऱ्यांसह ९ जणांच्या विभागीय चौकशीचे आदेश जारी केले. चौकशीवर परिणाम होऊ नये यासाठी या ९ जणांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे.

# ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची लूट; तिकीट दरांमध्ये दुप्पट-तिप्पट वाढ

## परिवहन विभागाचे नियंत्रण नसल्याची जनतेची तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

उन्हाळी सुट्ट्यांमुळे एसटीने हंगामी भाडेवाढ केली असतानाच खासगी ट्रॅव्हल्सकडून तिकिटांचे दर दुप्पट-तिप्पट वाढवून प्रवाशांची लूट करण्यात येत आहे. विशेषत: अमरावती - पुणे ,इंदोर,शिर्डी आणि नाशिक या मार्गांवर तिकिटांचे दर भरमसाट वाढविण्यात आले असून, त्यावर परिवहन विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे प्रवाशांना वाढीव भाडे मोजावे लागत असून त्यांच्यात मोठी नाराजी आहे.

अमरावती पंचवटी चौकामधून दररोज शेकडो खासगी बस सुटतात आणि सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांची मागणी वाढल्याने बसची संख्या वाढविली जाते, त्याचवेळी तिकीट दरही वाढविले जातात.

सध्या एसी स्लीपरसाठी २५०० ते ३,५०० रुपये, तर सीटिंगसाठी २००० ते २५०० रुपये आकारले जात आहेत.गणपती, दसरा, दिवाळी, होळीचा सण तसेच उन्हाळी सुट्ट्यांमध्ये बाहेरगावी जाणाऱ्यांची संख्या मोठी असते. मात्र एसटी आणि रेल्वेची तिकिटे ऐनवेळी मिळत नसल्याने प्रवासी खासगी ट्रॅव्हल्सकडे वळतात. याच संधीचा फायदा घेत दरवाढ केली जात असल्याची तक्रार प्रवाशांकडून होत आहे.